25 APR 2026

शेतीशिंद

# शिवाजी विद्यापीठात शाश्वत शेती परिषद

कोल्हापूर(प्रतिनिधी):-शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, शेती शाश्वत करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ येथे आज शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी या विषयावर एकदिवसीय परिषद होणार आहे. विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात सकाळी ११ वाजता परिषदेचे उद्घाटन होणार आहे.महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांद्वारे पूरक व्यवसाय व लघुउद्योगांवर विशेष सत्र होणार आहे. जिल्ह्यातील शेतकरी, महिला व ग्रामीण घटकांनी या परिषदेत सहभागी व्हावे, असे आवाहन डॉ. माळी यांनी केले आहे.

2 5 APR 2026
पुण्यनगरी

# एम.एस्सी.-पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शिकविल्या जाणाऱ्या एम. एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम, तसेच ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे, अशा अभ्यासक्रमांच्या भाग १ प्रवेशासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. या प्रवेश परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. २७ एप्रिलपर्यंत असून, ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही, अशा अभ्यासक्रमांसाठी दि. ३१ मेपर्यंत अर्ज करता येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली आहे. विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार, प्रवेश परीक्षा असलेल्या अभ्यासक्रमांची परीक्षा १२ ते १५ मे या कालावधीत घेतली जाणार आहे. प्रवेशासंदर्भातील सविस्तर माहिती व सूचना संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.

2 5 APR 2026

जनप्रवास

# विद्यापीठाच्या २०२६-२७ प्रथम वर्ष प्रवेश अर्जाबाबत आवाहन

**जनप्रवास : कोल्हापूर**

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात शिवाजी विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या एमएस्सी व तत्सम अभ्यासक्रम तसेच विद्यापीठ अधिविभागांकडील ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा आहे अशा अभ्यासक्रमांच्या भाग १ प्रवेशाच्या प्रवेश परीक्षेसाठी २७ एप्रिलपर्यंत तसेच ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही, अशा अभ्यासक्रमांसाठी ३१ मे अखेर अर्ज मागणी करण्यात आले आहेत. विद्यापीठ संकेतस्थळावर प्रवेश परीक्षा असलेल्या व ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही, याचा सविस्तर तपशिल https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information या लिंकवर Admission Notification २०२६-२०२७ या ठिकाणी उपलब्ध आहे. प्रवेश परीक्षा असलेल्या अभ्यासक्रमांची प्रवेश परीक्षा १२ मे ते १५ मे अखेर घेण्यात येणार आहे. प्रवेश परीक्षेचे ओळखपत्र विद्यार्थ्यांच्या लॉगिनवर प्रवेश परीक्षेपूर्वी ३ दिवस उपलब्ध करण्यात येणार आहे



**● सविस्तर तपशिलासाठी संकेतस्थळाला भेट द्या**

विद्यार्थ्यांनी सविस्तर तपशिलासाठी https://www.unishivaji.ac.in/mscadmission/For-Student-Information या संकेतस्थळाला भेट द्यावी. प्रवेशासंदर्भात अद्ययावत माहिती वेळोवेळी वरील संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

2 5 APR 2026 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महाजन यांचे संशोधन केंद्रास भरीव योगदान

## ज्योती जाधव : विद्यापीठात शोकसभेत श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता आणि वाणिज्य व व्यवस्थापन विभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे गाढे अभ्यासक होते, अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मंगळवारी व्यक्त केली.

प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. जाधव बोलत होत्या. त्या म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्रास त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या निधनामुळे शैक्षणिक क्षेत्राची न भरून येणारी हानी झाली आहे. डॉ. केदार मारूलकर म्हणाले, सकारात्मक विचार करताना विद्यार्थी आणि विद्यापीठ हित यांचा कायम डॉ. महाजन विचार करीत असत. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले.

यावेळी डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. माधव पाटील, डॉ. उदय पाटील, डॉ. दीपा इंगवले, डॉ. गोविंद कोळेकर, डॉ. पवन गायकवाड, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. किशोर खिलारे, आनंदराव खामकर, निवास माने, संशोधक विद्यार्थी यांनी शोकभावना व्यक्त केल्या. याप्रसंगी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. शरद बनसोडे, डॉ. अवनिश पाटील, डॉ. निशा मुढे, डॉ. राजेंद्र सोनकवडे, प्रिया देशमुख उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 APR 2026 पुढारी

# जनसंपर्क क्षेत्रात सत्य, नैतिकता महत्त्वाची

## उपसंचालक प्रवीण टाके; 'पीआरएसआय' कोल्हापूर चॅप्टरचे उद्घाटन



**कोल्हापूर : 'पीआरएसआय' कोल्हापूर चॅप्टरचे उद्घाटन रोपट्यास पाणी घालून करताना उपसंचालक प्रवीण टाके. समवेत अंकुश चव्हाण, डॉ. रवींद्र चिंचोळकर, प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, डॉ. निशा मुडे, विश्वजित भोसले आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनानंतर जनसंपर्क क्षेत्र अधिक महत्त्वाचे झाले असून विश्वासार्हता टिकवणे गरजेचे आहे. एआय टूलच्या वापरामुळे कामास गती मिळते; मात्र आपत्कालीन स्थितीत सत्य, नैतिकता जपणे आवश्यक आहे, असे मत विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक प्रवीण टाके यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या संख्याशास्त्र विभागाच्या सभागृहात आयोजित पब्लिक रिलेशन सोसायटी ऑफ इंडियाच्या (पीआरएसआय) कोल्हापूर चॅप्टर उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी भारतीय सुरक्षा सेनेच्या दक्षिण कमांडचे जनसंपर्क अधिकारी अंकुश चव्हाण, सोलापूर विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, कोल्हापूर चॅप्टरच्या अध्यक्ष प्रा. डॉ. निशा मुडे-पवार, सचिव विश्वजित भोसले, कोषाध्यक्ष सचिन मोरे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी डॉ. चिंचोलकर म्हणाले, जनसंपर्क व सत्य एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. एआयच्या काळात माहितीची सत्यता तपासणे आवश्यक बनले आहे. जनसंपर्क व माध्यमातील सर्वांनाच प्रॉम्प्ट ट्रेनिंग आवश्यक आहे. एआयचा वापर शिकल्यास नोकऱ्यांची संधी उपलब्ध असेल.

डॉ. अनुराधा इनामदार, डॉ. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. वारणा कॉलेजचे प्राचार्य डॉ. प्रताप पाटील, माझगाव डॉकचे माध्यम सल्लागार पी. एस. पाटील, जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, माहिती अधिकारी वृषाली पाटील, आकाशवाणी पुणे वृत्त विभागाचे माधव जायभाई, महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी मोहन सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र पारिजात उपस्थित होते.

25 APR 2026

जनप्रवास

# डॉ. श्रीकृष्ण महाजन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे गाढे अभ्यासक : डॉ. जाधव

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे माजी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे प्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे गाढे अभ्यासक होते. विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र आणि सामाजिक समावेशन केंद्रास त्यांनी भरीव योगदान दिले. डॉ. महाजन यांनी कार्याच्या माध्यमातून विभागास राष्ट्रीय पातळीवर पुढे नेले. एक सहृदयी आदर्श व्यक्तिमत्व होते. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठाची, समाजाची आणि शैक्षणिक क्षेत्राची न भरून येणारी हानी झाली आहे, अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचे अपघातामुळे निधन झाले. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन केले होते. याप्रसंगी डॉ. जाधव बोलत होत्या.

वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे डॉ. केदार मारूलकर म्हणाले, डॉ. महाजन हे भविष्यातील शैक्षणिक सुधारणांबाबत नेहमी काळाच्या पुढे जाऊन विचार करीत आणि प्राधान्याने अंमलबजावणी करीत होते. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले. यावेळी आजीवन अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, नॅक विभागाचे डॉ. सागर डेळेकर, इतिहास अधिविभागाचे माजी अधिविभागप्रमुख डॉ. माधो पाटील, तंत्रज्ञान अधिविभागाचे डॉ. उदय पाटील, एमबीए अधिविभागप्रमुख डॉ. दीपा इंगवले, रसायनशास्त्र अधिविभागाचे डॉ. गोविंद कोळेकर, इलेक्ट्रॉनिक्स अधिविभागप्रमुख डॉ. पवन गायकवाड, डॉ. मुरलीधर भानारकर, डॉ. किशोर खिलारे, कास्ट्राईब संघटनेचे अध्यक्ष आनंदराव खामकर, उपकुलसचिव निवास माने, संशोधक विद्यार्थी यांनी शोकभावना व्यक्त केल्या. याप्रसंगी परीक्षा व मूल्यमापन केंद्राचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे, डॉ. अवनिश पाटील, डॉ.निशा मुढे, डॉ. राजेंद्र सोनकवडे, लेखा विभागाचे उपकुलसचिव प्रिया देशमुख आदी होते.

25 APR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महात्मा फुले–महर्षी शिंदे यांच्या विचारांत परिवर्तनाची सलग परंपरा

## –डॉ. राजन गवस

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महात्मा जोतिराव फुले आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे स्वतंत्र काळातील असले तरी त्यांच्या विचारांमध्ये समाज परिवर्तनाची एक सलग परंपरा दिसून येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. राजन गवस यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महात्मा फुले यांचे द्विशताब्दी जयंती वर्ष व महर्षी शिंदे यांची १५३ वी जयंती या संयुक्त निमित्ताने 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे : अनुबंधांचा अन्वयार्थ' या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले. त्या चर्चासत्राचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

यावेळी पुण्याच्या प्रा. सुशील धसकटे यांचे बीजभाषण झाले. धसकटे म्हणाले, फुले यांनी ज्या ठिकाणी अस्पृश्य मुलांसाठी शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, त्याच भूमीवर पुढे महर्षी शिंदे यांनी आपले कार्य उभारले. यावरून शिंदे यांनी फुले यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केल्याचे दिसते.




कोल्हापूर : चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, समताधारित समाजनिर्मितीसाठी काम करणाऱ्या सर्व महामानवांचा एकत्रित, संतुलित असा अभ्यास साकल्याने करण्याची आजघडीला गरज आहे.

सुरुवातीला महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या प्रतिमांना मान्यवरांनी अभिवादन केले. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना यावेळी श्रद्धांजली वाहण्यात आली. मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला, तर प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानले. कार्यक्रमास डॉ. अनिल गवळी, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. अवनीश पाटील, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

दुपारच्या पहिल्या सत्रात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा अन्वयार्थ' या विषयावरील चर्चेत उद्धव धुमाळ (पुणे), डॉ. प्रकाश पवार आणि रमेश चव्हाण (पुणे) यांनी सहभाग घेतला. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दुसऱ्या सत्रात 'महात्मा फुले आणि महर्षी शिंदे यांच्या कार्याचा सामाजिक-सांस्कृतिक अनुबंध' या विषयावरील चर्चेत डॉ. भक्ती महाजन (गोवा), डॉ. सुरेश शिखरे, मोहसीन पठाण यांनी सहभाग घेतला. प्राचार्य डॉ. शंकरराव कदम (कराड) यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप झाला.

25 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांवर भर द्यावा

## अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी : शिवाजी विद्यापीठातील एकदिवसीय परिषदेला प्रतिसाद

**जनप्रवास : कोल्हापूर**

शेतकऱ्यांच्या अडचणी समाजाचा प्रश्न आहे. पशूपालन आणि शेती याची सांगड घातली पाहिजे. प्रगती साधण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांवर भर देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने "शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृध्दीसाठी" या विषयावर विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये एकदिवसीय परिषद आयोजित केली होती. त्यावेळी भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी बोलत होते. यावेळी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

दिनेश कुलकर्णी म्हणाले, शेती विषयक जागृतीपर कार्यक्रम शिवाजी विद्यापीठामध्ये होत आहे, हे आनंददायी आहे. विकसित भारताचे स्वप्न घेऊन पुढे जाताना, शेती समृद्ध करीत असताना ते शाश्वत पध्दतीने होईल, याकडे कटाक्षाने लक्ष देणे गरजेचे आहे. शेतीमुळेच आपण कोव्हीड सारखे मोठे संकट निवारण करू शकलेलो आहोत. पन्नास, साठ वर्षांपासून हरितक्रांतीच्या दिशेन जात असताना आपण आत्मनिर्भरतेकडे मार्गक्रमण करीत आहोत. जगामध्ये सर्वाधिक अन्नधान्य उत्पादन करणारा देश म्हणून आपण पुढे येत आहोत.



कोल्हापूर : परिषदेत बोलताना दिनेश कुलकर्णी. सोबत अन्य मान्यवर.

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य सिध्दार्थ शिंदे यांनी मनोगत मांडले. कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी म्हणाले, केंद्राच्या आणि राज्याच्या योजनांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. रोपवाटिकांच्या माध्यमातून गटांना आणि रोपवाटिका धारकांना व्यवसाय निर्माण करण्याची मोठी संधी उपलब्ध झालेली आहे. राज्य शासन आणि पाणी फौंडेशनच्या वतीने महत्वपूर्ण अशा शेतकऱ्यांच्या गट स्पर्धा घेतल्या जातात. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव म्हणाल्या, शेतकऱ्यांनी मूल्यवर्धीत उत्पादन घेऊन त्याचे योग्य पद्धतीने मार्केटिंग करून प्रगती साध्य केले पाहिजे. गुणवत्तापूर्ण उत्पादनास फार मोठी मागणी असल्याने स्थानिकांना रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते रोपास पाणी वाहून कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालयाच्या सहा. प्राध्यापिका डॉ. उर्मिला दशवंत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी कृषी उपसंचालक तथा जिल्हा नोडल अधिकारी नामदेव परीट, राजेंद्र माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास प्रशालेचे प्रभारी संचालक डॉ. नितिन माळी, तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. प्रविणकुमार पाटील, डॉ. इराण्णा उडचान, डॉ. स्नेहल खांडेकर, शीतल पाटील आदी होते.

### जीआयची कास धरून पुढे जावे

दिनेश कुलकर्णी यांनी सांगितले की, एक पीक पध्दतीमुळे शेतकऱ्यांचे शोषण होऊ शकते. त्यामुळे आता, शेतकऱ्यांनी स्वतः किंवा समूहातून प्रक्रिया केलेले साहित्य बाजारात घेऊन जाणे महत्वाचे आहे. जीआयची कास धरून पुढे जाणे उचित ठरणार आहे. समाजाला अशा प्रकारच्या उद्योगांची व्यवस्था करावी लागेल, ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या सर्व मुलांना कामे मिळतील.

जनसंपर्क कक्ष

25 APR 2026 सकाळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतकऱ्यांनी पूरक उद्योगांवर भर देण्याची गरज : कुलकर्णी

कोल्हापूर, ता. २४ : 'प्रगती साधण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांवर भर देणे आवश्यक आहे. त्यांनी स्वतः किंवा समुहातून प्रक्रिया केलेले साहित्य बाजारात घेऊन जाणे महत्त्वाचे आहे', असे प्रतिपादन भारतीय किसान संघाचे अखिल भारतीय संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठ, शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघाने 'शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी' या विषयावर विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहामध्ये शेती परिषद झाली. यावेळी ते बोलत होते. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव प्रमुख उपस्थित होत्या.

'शेतकऱ्यांनी जीआयची कास धरून पुढे जाणे उचित ठरणार आहे. समाजाला अशा प्रकारच्या उद्योगांची व्यवस्था करावी लागेल,



शिवाजी विद्यापीठ : शेती परिषदेत 'द मिऱ्याकल ऑफ मिलेटस्' या पुस्तकाचे प्रकाशन करताना दिनेश कुलकर्णी, ज्योती जाधव, बसवराज मास्तोळी, सिद्धार्थ शिंदे, आदी उपस्थित होते.

ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या सर्व मुलांना कामे मिळतील,' असे कुलकर्णी यांनी सांगितले.

व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे म्हणाले, 'ग्रामीण रोजगाराच्या अडचणी सोडविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न व्हावेत. गावात चांगले उत्पन्न मिळाले, तर शेतकरी प्रगतिशील होईल.'

'सातत्यपूर्ण आणि सुरक्षित अन्नपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी शाश्वत शेती पद्धती अत्यंत महत्त्वाची असल्याचे कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी सांगितले. 'शेतकऱ्यांनी मूल्यवर्धित उत्पादन घेऊन त्याचे योग्य पध्दतीने मार्केटिंग करून प्रगती साध्य केली पाहिजे', असे आवाहन डॉ. जाधव यांनी केले.

यावेळी सिद्धार्थ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेले 'द मिऱ्याकल ऑफ मिलेटस् : लोकल ग्रेन्स, मॉडर्न वंडर्स' या पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी नामदेव परीट, राजेंद्र माने, जालिंदर पांगरे, डॉ. विद्यासागर गेडाम, नितीन माळी, प्रवीणकुमार पाटील, इराण्णा उडचान, स्नेहल खांडेकर, शीतल पाटील, उर्मिला दशवंत आदी उपस्थित होते.

2 5 APR 2026
लोकमत

# शेतीपूरक उद्योगांवर भर देणे काळाची गरज : दिनेश कुलकर्णी

## शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेवर परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शेतकऱ्यांच्या समस्या या केवळ शेतकऱ्यांपुरत्या मर्यादित न राहता त्या आता समाजाच्या प्रश्नात परिवर्तित झाल्या आहेत. त्यामुळे शेतीसोबत पशुपालन आणि पूरक उद्योगांची सांगड घालणे अत्यावश्यक असून, शेतकऱ्यांनी शेतीवर आधारित पूरक उद्योगांकडे वळणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन दिनेश कुलकर्णी यांनी केले.



शिवाजी विद्यापीठ, महाराष्ट्र शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय किसान संघातर्फे "शाश्वत शेती व कृषी अर्थव्यवस्थेच्या क्षमता वृद्धीसाठी" या विषयावर आयोजित एकदिवसीय परिषदेत ते बोलत होते. कार्यक्रमास प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी शेतकऱ्यांना शासकीय योजनांची माहिती मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. कृषी सहसंचालक बसवराज मास्तोळी यांनी शाश्वत शेती पद्धती, पीक फेरबदल आणि सेंद्रिय शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी मूल्यवर्धित उत्पादन आणि प्रभावी मार्केटिंगद्वारे शेतकऱ्यांनी प्रगती साधावी, असे आवाहन केले.

डॉ. ऊर्मिला दशवंत यांनी प्रास्ताविक केले. यावेळी कृषी उपसंचालक नामदेव परीट, राजेंद्र माने, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी जालिंदर पांगरे, प्रादेशिक ऊस व गूळ संशोधन केंद्र प्रमुख डॉ. विद्यासागर गेडाम, डॉ. नितीन माळी, तंत्रज्ञान अधिविभागातील डॉ. प्रवीणकुमार पाटील, डॉ. इराण्णा उडचान, डॉ. स्नेहल खांडेकर, शीतल पाटील उपस्थित होते.

2 6 APR 2026

जनप्रवास

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# चुलीपासून विद्यापीठापर्यंत... ग्रामीण स्त्रीच्या जिद्दीचा प्रवास

## दोनवडे येथील डॉ. कल्पना गुरव यांनी स्वप्नांचाा पाठलाग करत मिळवली डॉक्टरेट

जनप्रवास : गडहिंग्लज

ग्रामीण भागातील स्त्री म्हणजे केवळ घरकाम आणि शेतीपुरती मर्यादित अशी पारंपरिक समजूत आजही अनेक ठिकाणी दिसून येते. मात्र या समजुतीला छेद देत दोनवडे (ता. करवीर) येथील डॉ. कल्पना सुनील गुरव यांनी जिद्द, संघर्ष आणि शिक्षणाच्या जोरावर यशाचं शिखर गाठलं आहे.

भोगावती नदीपलीकडील ग्रामीण वातावरणात वाढलेल्या कल्पना गुरव यांचे बालपण कर्नाटकात माहेरी गेले. मर्यादित परिस्थितीतही शिक्षणाची ओढ कायम ठेवत त्यांनी लग्नानंतरही आपली स्वप्ने जपली. अनेक महिलांची स्वप्ने संसाराच्या ओझ्याखाली दडपली जातात; परंतु गुरव यांनी परिस्थितीशी झुंज देत शिक्षणाची वाट सोडली नाही.

शिवाजी विद्यापीठ येथे बहिस्थ पद्धतीने शिक्षण घेत त्यांनी इतिहास विषयात एम.ए. पूर्ण केले. त्यानंतर बी.एड. आणि पर्यावरणशास्त्रातील पदविका संपादन करून त्यांनी स्वतःची शैक्षणिक ओळख दृढ केली.



पहाटे पाच वाजता सुरू होणारा दिवस—घरकाम, शेती, गुरांची देखभाल आणि त्यानंतर महाविद्यालयात अध्यापन—असा तिहेरी ताळमेळ त्यांनी साधला आहे. कसबा बीड येथील महिला महाविद्यालयात त्यांनी अध्यापनाची सुरुवात केली. पुढे कागल येथील माने महाविद्यालयात त्यांनी अध्यापन केले. सध्या खाडे महाविद्यालय, कोपार्डे येथे कार्यरत आहेत.

आयुष्यातील कठीण टप्प्यांनाही त्यांनी धैर्याने सामोरे गेले. सासूबाईंच्या आजारपणात केलेली सेवा, त्यानंतर आलेला भावनिक धक्का आणि वाढलेल्या जबाबदाऱ्या—या सर्वांचा सामना करत त्यांनी आपली शैक्षणिक वाटचाल सुरूच ठेवली.

त्यांच्या यशामागे त्यांच्या पतींचा मोठा वाटा आहे. त्यांनी घर आणि शेतीची जबाबदारी सांभाळत कल्पना गुरव यांच्या शिक्षणाला भक्कम पाठबळ दिले. ही साथ आपल्याला सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्त्रीशिक्षणाच्या विचारांची आठवण करून देते.

करिअरच्या प्रवासात आलेल्या एका मुलाखतीतील नकाराने त्या खचल्या नाहीत. उलट त्याच प्रसंगाला त्यांनी प्रेरणेत रूपांतरित केले. अवघ्या सहा महिन्यांत त्यांनी SET परीक्षा उत्तीर्ण करून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

यानंतर त्यांनी संशोधनाच्या क्षेत्रात पाऊल टाकत इतिहास विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केली. 'डॉ.' ही मानाची पदवी मिळवत त्यांनी केवळ वैयक्तिक यश संपादन केले नाही, तर ग्रामीण स्त्रीच्या जिद्दीचा आदर्श निर्माण केला.

डॉ. कल्पना गुरव यांचा प्रवास हा आजच्या ग्रामीण मुलींसाठी प्रेरणादायी आहे. जबाबदाऱ्या अडथळा नसून त्या यशाच्या पायऱ्या ठरू शकतात, हे त्यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. कुटुंबाचा आधार, पतीची साथ, स्वतःची चिकाटी आणि शिक्षणाची ओढ—या चार स्तंभांवर त्यांनी यशाची उंच इमारत उभी केली आहे.

त्यांच्या या प्रवासाकडे पाहताना एक गोष्ट स्पष्ट होते. स्वप्ने पाहण्याचे धाडस आणि त्यासाठी झगडण्याची तयारी असेल, तर कोणतीही 'कल्पना' एक दिवस 'वास्तव' बनू शकते.